दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • शनिवार दि.२ मे २०२६ • अंक-१०० • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

## बारावीचा निकाल आता अवघ्या काही तासांवर

**मुंबई–**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेचा निकाल आज, २ मे रोजी जाहीर होणार आहे. दुपारी ठीक १ वाजता मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना त्यांचे गुण पाहता येतील. गेल्या अनेक दिवसांपासून निकालाची प्रतीक्षा करणाऱ्या १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस महत्त्वाचा ठरणार आहे.यंदा राजभरातून एकूण १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. यामध्ये सर्वाधिक संख्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांची आहे.

# सिद्दीकींना भावुक होऊन नाही,तर मेरिट पाहून उमेदवारी:मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधान परिषद निवडणुकीसाठी माजी आमदार झिशान सिद्दीकी यांना उमेदवारी जाहीर होताच अजित पवार गटातील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. पक्षाचे आक्रमक आमदार अमोल मिटकरी यांनी आपल्याला डावलल्याची खंत व्यक्त करत थेट बंडाचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मैदानावर उतरत हा निर्णय भावनेच्या भरात नाही, तर मेरिटवर आधारित आहे, असे सांगत डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला आहे.आमदार अमोल मिटकरी यांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त करताना पक्षाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मला उमेदवारी नाकारताना पक्षाने साधं विश्वासात घेण्याचं सौजन्यही दाखवलं नाही, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. अजित पवारांच्या विमान अपघाताच्या प्रकरणाचा संदर्भ देत, याबद्दल प्रश्न विचारल्याचे फळ मला मिळाले का? असा बोचरा सवाल त्यांनी विचारला आहे. भविष्यात अजित पवारांच्या अपघाती मृत्यूसंदर्भात जे सोबत असतील, त्यांच्यासोबत मी जाईन, असे विधान करून मिटकरींनी आपण पक्षाच्या चौकटीबाहेर विचार करू शकतो, असे मोठे संकेत दिले आहेत. मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, मिटकरी यांचा काहीतरी गैरसमज झाला असावा. पक्षात प्रत्येक निर्णय हा सर्वांना विश्वासात घेऊनच घेतला जातो. बाबा सिद्दीकी यांचे मुंबईच्या विकासातील आणि पक्षातील योगदान मोठे आहे. झिशान सिद्दीकी हे स्वतः अनुभवी आमदार राहिले आहेत. त्यामुळे केवळ सहानुभूती म्हणून नाही, तर त्यांची ज्येष्ठता आणि मुंबईतील राजकीय समीकरणे पाहूनच सुनेत्रा वहिनींनी हा निर्णय घेतला आहे.विधान परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आलेल्या एकमेव जागेसाठी पक्षाने झिशान सिद्दिकींना संधी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये



फूट पडल्यानंतर काँग्रेसची साथ सोडून अजित पवारांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणारे बाबा सिद्दिकी हे पहिले बडे नेते होते. त्यांच्या निधनानंतर सिद्दिकी कुटुंबाची राजकीय वारसदारी झिशान सिद्दिकी समर्थपणे सांभाळत आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी झिशान यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यांच्या याच निष्ठेचा विचार करून पक्षाने त्यांना विधान परिषदेवर पाठवण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर झिशान सिद्दिकी म्हणाले की, मी वहिनी साहेब, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, पार्थ पवार यांचे आभार मानतो. त्यांनी मला एक संधी दिली. अजितदादांचा जो वादा होता, तो त्यांनी पूर्ण केला. माझ्यासारख्या युवा नेतृत्वाला त्यांनी विधान परिषदेत पाठवले. देशातील युवा वर्गाला राष्ट्रवादी पक्षाशी जोडण्यासाठी मी पूर्णपणे प्रयत्न करेल. अल्पसंख्याकांसाठी आवाज उठवेल. वहिनी साहेबांच्या नेतृत्त्वा महिला सक्षमीकरणासाठी काम करू. आपले दुःख बाजुला ठेवून आपल्याला लोकांसाठी काम करायचे आहे.

# पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कारभाराची,कोट्यवधीच्या भ्रष्टाचाराची शासनाकडून सखोल चौकशीची मागणी!

**पनवेल | प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यामधील श्रीमंत पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कारभाराची व कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराची शासन व प्रशासन पातळीवर सखोल चौकशीची मागणी येथील व्यापारी वर्ग आणि नागरिक तसेच पनवेल तालुक्यातील शेतकरी वर्ग करीत आहेत. शासन नियमानुसार बाजार समितीत शेतकरी व्यापारी ,यांना पायाभूत व मूलभूत सुविधा व सेवा यांचा अभाव जाणवत आहे

या समितीची स्थापना सन १९५७ साली करण्यात आली. या संस्थेला सात दशकांचा कालावधी उलटून जाऊन एकाच पक्षाच्या हातात सत्तेच्या चाव्या राहिल्यामुळे भ्रष्टाचाराला मोकळे रान मिळाले. आणि तोच पक्ष आता शेवटची घटका मोजत आहे. आता फक्त बाजार समितीची सत्ता त्यांच्या हातात राहिल्याने जेवढे ओरबाडत येईल तेवढे घेण्यासाठी त्यांची चढाओढ सुरू आहे.

सदर संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदविण्यात आली असून राज्य शासनाद्वारे स्थापन केलेली एक वैधनिक संस्था आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) अधिनियम १९६३ अंतर्गत या संस्थेचे कामकाज चालते. या संस्थेवर पणन संचालनालय पुणे, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग महाराष्ट्र शासन यांचे नियंत्रण आहे.

पनवेल तालुक्यातील १६४ गावे ८० ग्रामपंचायती, पनवेल महानगर पालिका, कळंबोली, तळोजा , खारघर, उलवे, पनवेल, नवीन पनवेल, शहरांचा समावेश असून या संस्थेचा कार्यक्षेत्राचा आवाका मोठा आहे. पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती ( मार्केट यार्ड) संस्था अधिनियम १९६३ अंतर्गत बाजार समिती काम करत असून शेतीमालाला योग्य भाव मिळवून देणे, व्यापाऱ्यांकडून होणारी लूट थांबविणे, लिलाव प्रक्रिया नियंत्रित करणे याप्रमाणे संस्थेचे कामकाज करणे बंधनकारक आहे.

असे असताना समितीच्या कारभारात मोठी अनियमितता दिसून येत आहे. पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये अनधिकृत ८२ तरपट, ओटे उभारून ते १५ लाखांना विकून ५० हजारची पावती देवून मोठ्या रक्कमेवर डल्ला मारल्याचे समजते. मार्केट यार्ड मधील रस्त्यावर गाळे बांधण्यात आले असून ते गायब होण्याच्या मार्गावर आहेत. तसेच मार्केट मधील काटे हलवून तेथे गाळे उभारण्याच्या तयारीत मार्केट यार्ड समिती असल्याचे दिसून येते. पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अनधिकृत धंदे लावून नियमांचे पालन करणाऱ्या आणि रीतसर गाळे विकत घेणाऱ्या व्यापाऱ्यांची गळचेपी करून, प्रशासनाच्या आशीर्वादाने अनधिकृत टोपलीवाल्यांचे 'मल्टिप्लेक्स' थाटले जात असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे.

**पावतीच्या मागे मोठा भ्रष्टाचाराचा ❋ दररोज ७० ते ८० हजार रुपये कोणाच्या खिशात ?**

पनवेल मार्केट यार्डात ज्यांनी रीतसर लाखो रुपये मोजून ओटे किंवा गाळे घेतले आहेत, त्यांच्यावर गाळे बंद करण्याची वेळ आली आहे. त्यांच्याच दुकानासमोर आज अनधिकृत टोपल्या, कॅरेट आणि स्टॉल्सचा विळखा पडला आहे. धक्कादायक बाब



म्हणजे, या अतिक्रमणांवर कारवाई करण्याऐवजी बाजार समितीचे कर्मचारी त्यांच्याकडून दररोज ६०० रुपये अधिकृतपणे वसूल केले जात आहेत असल्याचे या दुकानदारांकडून समजते. पनवेल मार्केट यार्डात नाममात्र 'पावती' फाडत आहेत. या वसुलीच्या आड मोठा 'काळाबाजार' सुरू असून, गोळा होणारा पैसा नेमका समितीच्या तिजोरीत जातो की कोणाच्या खासगी खिशात? जातो हे चौकशी अंती समोर येणार आहे.

**मार्केट यार्ड मधील रस्ते,गायब, शौचालय गायब, तिथे आले गाळे❋ पण त्याचा हिशोबच नाही व्यापारी आणि नागरिकांच्या जीवाला धोका**

मार्केट यार्डसाठी असणाऱ्या रस्त्यावर गाळे आल्याने त्यांना निमुळते स्वरूप आले असून ते गायब होण्याच्या मार्गावर आहेत. यदा कदाचित अनुचित घटना घडली तर व्यापारी आणि ग्राहकांना मार्ग काढणे मुश्किल होवून चेंगरचेंगीत जीवित हानी होण्याची भीती वाटत आहे. मोक्याच्या ठिकाणी असलेली ही शौचालये चक्क तोडून तिथे 'व्हीआयपी' गाळे उभारण्यात आले आहेत. स्वच्छतेच्या सुविधेचे व्यापारीकरण करून हे गाळे नेमके कोणाच्या फायद्यासाठी बांधले गेले? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

**संशोधनाचा विषय: 'सरकारी' किती आणि 'खासगी' किती?**

पनवेल मार्केटमध्ये नक्की अधिकृत गाळे किती आणि कागदोपत्री नोंद नसलेले 'लाडके' गाळे किती, याची गणती करणे आता संशोधकांचे काम झाले आहे. इमारती पाडून नवीन रचनेच्या नावाखाली मोक्याच्या जागांचे जे वाटप झाले, त्यामागे 'मोठ्या रक्कमेची' देवाणघेवाण झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

मार्केट यार्ड मध्ये काही एखादी स्पोटक घटना झाली तर व्यापारी व नागरिकांना सुरक्षित बाहेर पडता यावे म्हणून मार्केट मध्ये ठिकठिकाणी रस्ते ठेवले होते. त्या रस्त्यांच्या जागेवर गाळे आले आहेत. मार्केट यार्डमध्ये काटे उभारण्यात आले आहेत. त्या जागेवर गाळे बांधण्याचा कुटिल डाव बाजार समितीने आखला असल्याचे समजते.

**शाळेची जागा हडप करण्याचा डाव, गाळे बांधून करोडोची मालमत्ता खिशात घालणार ?**

मार्केट यार्डने व्यापारी आणि येथील झोपडपट्टीतील मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून मार्केटला लागून असलेल्या इमारतीमध्ये रयत शिक्षण संस्थेची न्यू इंग्लिश स्कूल म्हणून शाळा सुरू करण्यात आली. सुरवातीला या शाळेतील शिक्षकांना पगार मार्केट यार्ड देत होता. आता त्या शाळेची इमारत पाडून जागेवर गाळे बांधण्याचा विचार बाजार समिती करत आहे. या १ ते १० पर्यंत विद्यार्थांना मार्केट यार्डच्या पत्रा टाकलेल्या जागेत कोंबड्या सारखे कोंडून शिक्षण दिले जात आहे. उष्णतेचा दाह एवढा भयंकर आहे की काही मुलांना त्याचा त्रास होत आहे.

# प्रसिद्धीचा काळ सरल्यावर दुर्लक्षित झालेल्या अभिनय क्षेत्रातील जेष्ठ कलाकारांना दैनंदिन आयुष्यात भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट (CAWT) ने सुरु केलेले काम अतिशय कौतुकास्पद-रविंद्र चव्हाण

**मुंबई । प्रतिनिधी**

अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी CAWT सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबईत केले.सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट CAWT आणि सिने अँड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने उ-थढच्या स्थापनेत आणि CINTAA - CAWT टॉवरच्या उभारणीत




ज्या विश्वस्थ कलाकारांनी आपले अमूल्य योगदान दिले, त्यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध अभिनेते दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख, अमरीश पुरी, अमजद खान, चंद्रशेखर वैद्य, दारासिंह या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी त्या कलाकारांचे फोटो आणि माहिती देणाऱ्या फलकाचे उद्घाटन आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळेस ते बोलत होते.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अभिनय क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराचा एक प्रसिद्धीचा काळ असतो. तो चांगला काळ ओसरला कि सरत्या काळात त्या कलाकारांकडे कुणी पाहत नाही. त्यांची कुणी चौकशी करत नाहीत. असे जवळपास ९ ते १० हजार कलाकार सध्या अभिनय क्षेत्रात आहेत. अशा कलाकारांचे दैनंदिन जीवन अतिशय हलाखीचे असते. यामध्ये अभिनय क्षेत्रात काम करणारे इतर कामगार यांची संख्या देखील मोठी आहे. याना सामाजिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, अशी माहिती मला CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू यांनी मला आज दिली. या सर्व समस्यांचे निराकरण करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे.

तसेच CAWT ला जेष्ठ कलाकारांकरिता मी कोकणातील केसरी, सावंतवाडी येथील माझी स्वतःची एक एकर जागा देण्यास तयार आहे, असे रविंद्र चव्हाण म्हणाले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी रविंद्र चव्हाण यांच्या सोबत जेष्ठ अभिनेत्री व CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू, ट्रस्टच्या सचिव अभिनेत्री संभावना सेठ, संस्थेचे खजिनदार अभिनेते दीपक पराशर, बॉलिवूड अभिनेते राजपाल यादव, मनोज जोशी, मुकेश ऋषी, आयुब खान, अभिनेत्री कुनिका आणि सिने व टीव्ही क्षेत्रातील अनेक कलाकार उपस्थित होते.

# लाकडावर उभे मृत्यूचं शेड कल्याण पंचायत समिती परिसरात जीवितास धोका

**संतोष पडवळ । ठाणे**

कल्याण येथील पंचायत समिती कार्यालयाच्या इमारतीबाहेर उभारण्यात आलेले शेड अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. हे शेड अक्षरशः पडक्या लाकडाच्या आधारावर उभे असून कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक पत्रकार व दक्ष नागरिक विशाल कुरकुटे यांनी याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाकडे लेखी निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. संबंधित शेडच्या परिसरातून दररोज नागरिक, कर्मचारी, दिव्यांग व्यक्ती, लहान मुले तसेच गर्भवती महिला ये-जा करत असल्यामुळे मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे.

या संदर्भात यापूर्वीही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले असतानाही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. याबाबत तातडीने शेड दुरुस्त करणे किंवा पूर्णपणे हटवण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा



येत्या काही दिवसांत नागरिकांच्या सुरक्षेसाठी आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे. आता या गंभीर बाबीकडे प्रशासन कितपत गांभीर्याने लक्ष देणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उरण नगरपरिषदेच्या कंत्राटी सफाई कामगारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर संपन्न



**उरण । विठ्ठल ममताबादे**

कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून उरण नगरपरिषदेच्या कंत्राटी सफाई कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने मोफत रक्त, बीपी, शुगर, ईसीजी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. नितीन तिवारी, कामगार नेते संतोष पवार, स्वप्नलता पाबळेकर, माजी उपनगराध्यक्षा तथा नगरसेविका नाहीदा ठाकूर, नगरसेविका प्रमिला पवार, नगरसेविका प्रार्थना म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

जनतेचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी स्वतःचे आरोग्य धोक्यात टाकणाऱ्या सफाई कामगारांची आरोग्य तपासणी होणे गरजेचे आहे, या भावनेतून श्री पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, उरण नगरपरिषद आणि म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर घेण्यात आले. मे सुश्रुषा हार्ट केअर सेंटर, पनवेल व नेक्स व्हिजन आय हॉस्पिटल, द्रोणागिरी-उरण यांच्या सहकार्याने या शिबिरात हृदय विकार तपासणी, ई.सी.जी., डोळे तपासणी, शुगर तपासणी, बी.पी. तपासणी तसेच लिपिड प्रोफाइल, LFT, KFT, CBC, Hba1c सह संपूर्ण रक्त तपासणी मोफत करण्यात आली.

श्री पॅथॉलॉजी लॅबोरेटरीच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त हे विशेष शिबीर दि. ०१ मे २०२६ रोजी सकाळी १०:००ते दुपारी २:०० या वेळेत उरण नगरपरिषद कार्यालय येथे घेण्यात आले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी श्री पॅथॉलॉजीचा स्टाफ तसेच म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी मधुकर भोईर, कोषाध्यक्ष माधव सिद्धेश्वरे यांनी विशेष मेहनत घेतली. भावनाताई घाणेकर नगराध्यक्षा ,संतोष पवार कार्याध्यक्ष, म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन, डॉ. नितीन तिवारी, डॉ. नयना पाटील-ठाकूर j आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# डबलडेकर बसमुळे ठाणेकरांचा प्रवास अधिक सुखकर होणार-उपमुख्यमंत्री

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत वातानुकलित डबलडेकर इलेक्ट्रिक बस दाखल झाली असून या बसचा शुभारंभ आज राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. या डबलडेकर बसमुळे ठाणेकरांचा प्रवास अधिक सुखकर, आरामदायी होणार असून ही बस आपली स्वतःची आहे असे समजून तिची काळजी घ्यावी असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी नमूद केले

यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर, महापालिका सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ शानू पठाण,





स्थानिक नगरसेवक राजेश मोरे, नगरसेविका काजल गुणीजन, अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, मधूकर बोडके, डॉ. मिताली संचेती, दिपक झिंजाड, जितेंद्र निकम, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिका भवन येथून लुईसवाडी ते पुन्हा महापालिका भवन असा प्रवास डबलडेकर बसमधून केला. जी.सी.सी तत्वावर या बसेस ठाणे परिवहनमध्ये दाखल होणार असून त्याचा कोणताही भार परिवहन सेवेवर पडणार नाही. या डबलडेकर बसमध्ये एकाचवेळी ६५ प्रवासी आसनस्थ होवून प्रवास करु शकणार आहे, तर ३३ प्रवासी उभे राहून प्रवास करु शकतील. सद्यस्थितीत ही बस तीन हात नाका ते गायमुख या मार्गावर धावणार आहे. इलेक्ट्रिक बस असल्यामुळे ठाणेकरांचा प्रवास पर्यावरणपूरक असा होणार असून ठाणेकरांना या बसमधून पर्यटनाचा आनंद लुटता येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. परिवहन ताफ्यात आणखी ९ बसेस लवकरच दाखल होणार असल्याचेही परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी नमूद केले.

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील सोनवी चौकात अभूतपूर्व वाहतूक कोंडी

## संगमेश्वरात वाहनचालक आणि ग्रामस्थ संतप्त;रुग्णवाहिका अडकली;वाहतूक पोलिसांची कमतरता

**संगमेश्वर । सत्यवान विचारे**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग वरील संगमेश्वर बाजारपेठ परिसरात सुरू असलेले चौपदरीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात रखडल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संगमेश्वर येथील सोनवी पुलाची एक मार्गीका ३१ मार्चपूर्वी सुरू करण्याचे दिलेले आश्वासन फोल ठरल्याने गेले काही दिवस संगमेश्वर सोनवी चौक येथे अभूतपूर्व वाहतूक कोंडी होत आहे. आज १ मे पासून सलग तीन दिवस सुट्ट्या आल्याने या मार्गावर वाहनांची संख्या वाढवून कमालीची वाहतूक कोंडी होत असल्याचे पाहायला मिळाले. वाहतूक शाखेच्या पोलिसांचा अभाव असल्याने वाहन चालक होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे त्रस्त आणि संतप्त झाल्याचे पाहायला मिळाले.

आज सकाळी सहा वाजल्यापासूनच संगमेश्वर सोनी चौकात वाहतूक कोंडीला सुरुवात झाली. वाहनांच्या सुमारे दोन ते तीन किलोमीटर रांगा लागल्याचे पाहायला मिळत होते. मुंबई कडून येणाऱ्या वाहन चालकाने गुगल मॅप वर पर्यायी रस्ता शोधून आपली वाहने संगमेश्वर बाजारपेठ मार्गे आणल्याने संगमेश्वर बाजारपेठेत देखील असंख्य वाहने एकाच वेळी आल्याने वाहतूक कोंडी झालेली पाहायला मिळाली. सकाळी सहा वाजता सुरू झालेली ही वाहतूक कोंडी दुपारी एक वाजला तरीही सुरूच होती. यातच आज सकाळी ५:३० च्या दरम्याने संगमेश्वर देवरुख मार्गावर बुरंबी करंबेळे दरम्यान एक जुनाट वटवृक्ष उन्मळून पडल्याने या मार्गावर देखील वाहतूक ठप्प झाली. राज्य परिवहन महामंडळाच्या बस बुरंबी सोनवडे कुसुम मार्गे देवरुख अशा वळवण्यात आल्या. अचानक संगमेश्वर येथील वाहतूक कोंडी आणि संगमेश्वर देवरुख रोडवर बुरंबी करंबेळे दरम्यान वडाचे झाड कोसळून झालेली वाहतूक कोंडी यामुळे वाहन चालक कमालीचे त्रस्त झाले.



संगमेश्वर ते माभळे दरम्यान राष्ट्रीय महामार्गाच्या अपूर्ण असणाऱ्या कामांमुळे वाहनचालक आणि नागरिकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. धामणी ते लांजा या भागात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाची अनेक कामे पूर्ण होणे बाकी असताना टोल नाके सुरू करण्याबाबत मात्र मोठ्या हालचाली सुरू झाल्याने कामे अपूर्ण आणि टोल नाके सुरू अशी विसंगती भविष्यात पाहायला मिळणार असल्याने वाहन चालकांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. संगमेश्वर येथील सोनवी पुलाजवळ वारंवार वाहतूक कोंडी होत असताना येथील एक मार्गिका ३१ मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे दिलेले आश्वासन फोल ठरले आहे. संगमेश्वर परिसरातील सर्व कामे पूर्ण होण्यास अजून वर्षभराचा कालावधी लागणार आहे. या परिसरातील वाहतूक कोंडी, ठेकेदाराच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे होणारे वाढते अपघात ही बाब चिंताजनक बनली आहे. चौपदरीकरण सुरू असताना पर्यायी रस्ते (डायव्हर्जन) मातीचे बनवण्यात आले असून, त्यावरून वाहने घसरून अपघात होण्याच्या घटना वाढल्या आहेत. अनेक ठिकाणी सर्विस रोडच तयार नसल्याचे दिसून येत आहे, तर जिथे आहेत तेही पूर्णपणे मातीचे असल्याने पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दोन दिवसांपूर्वीच संतप्त झालेल्या संगमेश्वर येथील स्थानिक ग्रामस्थ आणि वाहन चालकाने अचानक रास्ता रोको करून ठेकेदाराला वेगाने काम पूर्ण न केल्यास पाच मे रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

महामार्गावर ठिकठिकाणी मातीचे ढिगारे टाकलेले असून दिशादर्शक फलकांचा अभाव असल्याने वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे. बांधकाम सुरू असतानाही आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, अशी तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. चौपदरीकरणादरम्यान संरक्षण भिंत उभारणे अपेक्षित असताना त्या कामालाही सुरुवात झालेली नाही.

आज सकाळी सहा वाजल्यापासून सुरू झालेल्या संगमेश्वर येथील वाहतूक कोंडीमुळे वाहने अत्यंत मंद गतीने पुढे सरकत होती. वाहतूक सुरळीत करण्यास वाहतूक शाखेचे पोलीस देखील उपस्थित नव्हते. संगमेश्वर पासून शास्त्री पूल पर्यंत मुंबईच्या दिशेने तर सोनवी चौक पासून ओझरखोल पर्यंत रत्नागिरीच्या दिशेने वाहनांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळाल्या. याच वाहनात शास्त्री पुल येथून सायरन वाजवत येणाऱ्या रुग्णवाहिकेला देखील मार्ग मोकळा मिळणे अशक्य झाले. संगमेश्वर ते शास्त्री पूल दरम्यान एक मार्ग ठप्प असताना मुंबईहून येणाऱ्या छोट्या वाहन चालकांनी दुसऱ्या बाजूने वाहने घातल्याने एकाच वेळी दोन्ही बाजू ठप्प झाल्याचे पाहायला मिळाले. असा आगाऊपणा करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यास वाहतूक शाखेचे पोलीस उपलब्ध नसल्याने या गोंधळात आणखी भर पडला.

संगमेश्वर ते माभळे दरम्यान उंच खोदकाम करण्यात आल्याने गावकऱ्यांसमोर ये-जा करण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. भर उन्हात काम सुरू असताना धूळ नियंत्रणासाठी पाणीही पुरेसे टाकले जात नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.दरम्यान, येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण न झाल्यास वाहतूक ठप्प होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाने तातडीने लक्ष घालून कामे पूर्ण करावीत, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

**सोनवी पुलाची एक मार्गिका सुरू करणे आवश्यक**

सोनवी पूल येथे वारंवार होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता जन आक्रोश समितीने केलेल्या आंदोलनादरम्यान ३१ मार्चपूर्वी सोनवी पुलाची एक मार्गिका सुरू करण्याचे आश्वासन राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले होते. मात्र आता मे महिना सुरू झाला तरी या पुलाची एक मार्ग का सुरू न झाल्याने या वाहतूक कोंडीचा वारंवार सामना करावा लागत आहे. ठेकेदाराने मंद गतीने केलेले काम आणि कामात सुरू असणारा हलगर्जीपणा याची आता थेट केंद्रीय मंत्र्यांनी दखल घ्यावी आणि त्याला जबाबदार असणाऱ्या वर कठोर कारवाई करावी अशी संगमेश्वर वासियांची मागणी आहे .

## रानवली ग्रामपंचायत वतीने विविध क्षेत्रांतील गुणवंत आणि विकासकार्यात हातभार लावणाऱ्या मान्यवरांचा गौरव

**श्रीवर्धन । प्रतिनिधी**

कर्तव्यदक्ष करदात्यांमुळे ग्रामपंचायतीचा आर्थिक पाया मजबूत होतो आणि गावाच्या सर्वांगीण विकासाला मोठी गती मिळते.तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी , दानशूर व्यक्ती आणि कार्यक्षम अधिकारी व कर्मचारी यांच्या योगदानामुळे गावाची समृद्धी होण्यास वाढ होते.असे प्रतिपादन श्रीवर्धन पंचायत समितीचे सभापती सचिन किर यांनी केले. रानवली ग्रामपंचायतीने महाराष्ट्र दिनाच्या शुभमुहूर्तावर विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा आणि विकासकार्यात हातभार लावणाऱ्या मान्यवरांच्या सत्कार सोहळयाचे आयोजन केले आहे ही चांगली बाब आहे.कर्तव्यदक्ष करदाते वेळेवर कर भरतात यामुळे ग्रामपंचायतीचा ग्रामनिधी वाढतो आणि ग्रामपंचायतीला आर्थिक स्थैर्य मिळते.०१ ते १५ एप्रिल २०२६ दरम्यान विशेष कर वसुली मोहिमेत सहभागी होऊन आपला कर प्रामाणिकपणे भरला या ग्रामस्थांचा सत्कार आमच्या हस्ते होतोय ही आनंदाची गोष्ट आहे.असे सचिन किर यांनी सांगितले. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सकाळी दहा वाजता रानवली ग्रामपंचायत प्रांगणात ग्रामपंचायत वतीने रानवली येथील लोकप्रतिनिधी , दानशूर व्यक्ती , कार्यक्षम अधिकारी व कर्मचारी आणि कर्तव्यदक्ष करदाता अशा व्यक्तींचा गौरव करण्यासाठी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी रायगड प्रज्ञा शोध परीक्षेत प्रथम



पाच क्रमांकात आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी श्रीवर्धन पंचायत समिती उपसभापती पूजा शिंदे , सदस्य सुकुमार तोंडलेकर , माजी पंचायत समिती सभापती बाबूराव चोरगे , माजी पंचायत समिती सदस्य मंगेश कोमनाक , समाजसेवक राजू जाधव त्याचप्रमाणे उपसरपंच व सर्व सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामविकास अधिकारी अभिजीत माने , सूत्रसंचलन भिकू पांगरकर आणि आभार प्रदर्शन सरपंच सुरेश मांडवकर यांनी केले.

## यशोधन मध्ये वाढदिवस साजरा करत निरंजनने दिला माणुसकीचा संदेश

**वाई । प्रतिनिधी**

बँड - बाजा, फटाके, फुगे, आतिषबाजी, फ्लेक्स, जाहिरात आदी बाबींवर खर्च न करता निरंजनने फुल ना फुलाची पाकळी या उक्तीप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपत मा. श्री. रवी बोडके संस्थापक अध्यक्ष असलेल्या यशोधन, वेळे (ता. वाई) येथील अनाथ आश्रमास त्याच्या वाढदिवसाला येणाऱ्या खर्चा एवढ्या रकमेचा धनादेश सुपूर्त करत अनाथ व्यक्तींना स्वीट डिश दिली व त्यांच्यासोबत वेळ घालवत अत्यंत साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला. निरंजन सकट हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विद्यालय, वाई येथे इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत असून वाढदिवसासाठी मोठा खर्च किंवा दिखावा न करता समाजातील गरजू घटकांसाठी मदतीचा हात दिला पाहिजे असे म्हणत त्याने तरुणांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. भारतीय समाज सुधारकांचे जीवन व कार्य हा त्याच्या आवडीचा विषय असून त्याचे पालक दोघेही शिक्षक आहेत. श्री. रवी बोडके यांची अनाथांची सेवा हीच खरी मानवसेवा आहे. अनाथांचे नाथ म्हणजे श्री. रवी बोडके. अनाथांच्या जीवनात आशेचा किरण म्हणजे श्री. रवी बोडके. प्रेम, शिस्त व संस्कार म्हणजे श्री. रवी बोडके. त्यांच्यामुळे अनाथांना जगण्याची नवी दिशा मिळते. त्यांच्या कार्यात सेवाभाव, माणुसकी व



प्रामाणिकपणा आहे. श्री. रवी बोडके यांच्यासारख्या व्यक्तींमुळेच आज समाजात माणुसकी टिकून आहे असे मत निरंजनचे पालक प्रा. (डॉ.) अंबादास सकट व सौ. प्रीती सकट यांनी व्यक्त केले. श्री रवी बोडके यांनी निरंजनला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्याच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक केले. निरंजनच्या या स्तुत्य उपक्रमामुळे इतर विद्यार्थ्यांनाही सामाजिक बांधिलकीची प्रेरणा मिळेल अशी आशा व्यक्त होत आहे. याप्रसंगी निरंजनची आजी सौ. मीनाताई ससाने, श्री. संतोष लोकरे, श्री. वडणे आदी मान्यवर उपस्थित होते.

# नशेच्या काळाबाजार पानटपरी फुलचंदच्या पानातून

**आता पानटप–या ठरत आहे नशेच्या काळाबाजार ।।। महाकाल ,तरंग गोळ्या नशेसाठी वापर ।।। शिवाजीनगर टेम्पो मधून पोलिसांनी साडे तीन लाखांचा माल हस्तगत केला ।।। पुणे भर ठिकाणी एवढा मोठा माल सापडतो पोलीस काय करत होते**

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुण्यात ड्रग्ज मुक्ती बाबत पोलीस आयुक्त अमितेश कुमार सतत प्रयत्न करत असतांनाही शहरातील अनेक पोलिस ठाणे यावर लक्ष देत नसल्या कारणाने गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे अवैध धंद्यावर लगाम लावल्या नंतर कोणत्या मार्गाने आपल्याला आर्थिक पाठबळ मिळेल यावर काही पोलिस ठाण्याचे कर्मचारी यावर भर देत असतांनाच दिसत आहे तरूण नशेच्या आहारी ओढण्याचा आता पानटप–यांचा सहारा घेतला जात आहे बाणेर ,लोणी काळभोर,हडपसर ,शिवाजीनगर आणि ईतर ठिकाणी पानटप–यावर पाना मधून अनेक प्रकारचे नशेचे पावडर घालून त्यांची विक्री केली जाते यात शिवाजीनगर फुलचंद पानामधून नशेच्या गोळ्या विक्री होत असल्याचा धक्का दायक प्रकार समोर आल्या नंतर यात शिवाजीनगर पोलिसांनी कारवाई करत तीन लाख अडोतीस हजार रूपयांचे प्रतिबंधक गोळ्या केल्या नंतर महाकाल आणि तरंग या आयुर्वेदीक उपचारांमध्ये वापरल्या जाणा–या गोळ्या टेम्पो मधून जप्त करण्यात आल्या आहे पुणे पोलिसांची डिटेक्शन ब्रँच नेहमी प्रमाणे गस्त घालत असतांना पोलिस अंमलदार सचिन जाधव यांना एका खब–याकडून माहिती मिळाल्या नंतर दिनदयाळ हॉस्पिटल जवळ निर्जन रस्त्यावर एक टेम्पो बराच वेळ उभा होता पोलिस सहाय्यक निरीक्षक संतोष पाटील आणि त्यांच्या पथकाने तत्काळ



धाव घेत टेम्पोची झडती घेतली असता बंड्या च्या गोळ्यांनी भरलेल्या गोण्या आढळल्या असता या प्रकरणी विष्णू रामरतन गुप्ता. ( वय ३० राहणार पिंपरी- चिंचवड) याला अटक केली यानंतर पोलिसांनी सखोल चौकशी केल्या नंतर या मालाची तपासणी केल्या नंतर महाकाल आणि तरंग या गोळ्यांचे वैशिष्ट म्हणजे या गोळ्या वैद्यकीय कारणांसाठी वापर होतो मात्र या गोळ्यांचा वापर नशा म्हणून होतो या गोळ्यांची भूकटी करून ती फुलचंद पानात मिसळली जायची हे पान खाल्यानंतर व्यक्तीला एक वेगळीच नशा आणि सुस्ती येते शिवाजीनगर मधील मध्य वस्तीत असलेल्या फर्ग्युसन कॉलेज रोडवर आणि उच्चभ्रू परिसरात या मालाचा टेम्पो सापडतो यात पोलिस यंत्रणा किती काम करते हा टेम्पो कोठुन तरी आला असेल मग त्या त्या ठिकाणी असल्या टेम्पोची झडती का केल्या गेली नाही विद्येचे माहेर घर असणा–या पुण्यात जर अशा प्रकारे औषधी गोळ्या ,अफीम पावलं नशा युक्त पावडर पानातून लोणी काळभोर, हडपसर,शिवाजी नगर,बाणेर पोलिस ठाण्यात अंतर्गत पानटप–या मधून पानातून मिसळून यांचा वापर नवे साठी केला जातो हा प्रकार घातकच आहे याचा अर्थ या नशेखोरांनी आणि विक्री करणा–यांनी पानटप–या कडे वाट सूरू केलेली आहे ही धोक्याची घंटा आहे आता तर पानटपरी वर पान खावे की नाही याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे यात हा माल कोठून येतो कोण पुरवठा करतो पोलिसांनी या रॅकेट चे मुळ शोधून काढणे गरजेचे आहे शहरात अनेक पानटप–यावर यात पुण्यातील कोंढवा, मुंढवा, शिवाजीनगर, बाणेर, हडपसर,लोणी काळभोर आणि ईतर ठिकाणी अशा नशा युक्त पानटप–यावर पाने तयार करून जनतेला तसेच युवकांना आकर्शित केले जात आहे शहरातील अनेक पानटप–यावर नशा युक्त गोळ्या, पावडरची विक्री होते हा माल मध्यप्रदेश,उत्तरप्रदेश,बिहार,या राज्यातून कमी किंमतीत मिळतो गांजा ,अफिम, नशेच्या गोळ्या ,अनेक नवे युक्त पावडर महाराष्ट्रातील जवळचं असलेल्या मध्यप्रदेश मध्ये लहान लहान टपरी मध्ये विकला जातो दहा रूपयात मिळणारी भांग युक्त गोळी ,नशा युक्त ईतर गोळी दहा रूपयात दोन मिळतात यात ही गोळी आपल्या पुण्यात आल्या नंतर शंभर रूपयांचा एक गोळी विकली जाते या मुळे तक्रारी करणा–यांना फार मोठा सोर्स मिळत असल्या कारणाने आणि पुण्या ईतर अंमली पदार्थ विक्री बंद असल्याने हा मार्ग अवलंबला जातो हा सर्व माल पुण्यात येतो याचे अनेक एजंट कार्यरत असल्याचे दिसत आहे शिवाजीनगर मध्ये हा टेम्पो पकडण्यात आला यात पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले ,सहाय्यक पोलिस आयुक्त चंद्रकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीश कुमार दिघावकर या प्रकरणाची चौकशी करत आहे यात पुण्यात कोणत्या पानटप–यावर हा माल पुरवठा केला जातो यांची चौकशी करण्यात यावी .

## प्रभात मित्र मंडळात बुध्द जयंती, कामगार व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात बुध्द जयंती, कामगार व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड, सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, खजिनदार गौतम डांगळे, उपसचिव श्रध्दानंद निकम, संजय मयेकर, विलास देशनेहरे,सी.के.सर्वगोड, बबन देशनेहरे,सुरेश नलावडे आदि मान्यवर उपस्थित होते.प्रभात समयी मंडळाच्या गायकांनी बुध्द व भिम व महाराष्ट्र गीते गाऊन वातावरण प्रफुल्लित केले होते.विवेक गायकवाड, सी.के.सर्वगोड, संजय मयेकर यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली.

## रुग्ण मित्रांची सदिच्छा भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

दीक्षा हर्षद कारकर,अध्यक्षा विधी समिती,बृहन्मुंबई महानगरपालिका,व मा.डॉ.अस्मिता अद्वैत वैद्य,प्राचार्या शासकीय विधी महाविद्यालय,मुंबई यांची रुग्ण मित्रांनी सदिच्छा भेट घेतली.तद्प्रसंगी माहिती अधिकार कार्यकर्ता अनिल गलगली व रुग्ण मित्र विनोद साडविलकर हे उपस्थित होते. रुग्ण मित्र सहयोगी संस्थाना कायदेविषयक साक्षरता* उपक्रमाचे शासकीय विधी महाविद्यालय,मुंबई व विधी समिती अध्यक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने रुग्ण मित्र साथी संस्थांसाठी आयोजन करण्या संदर्भात चर्चा करण्यात आली.रुग्ण मित्र विनोद साडविलकर,ड.प्रफुल्ल नवार यांनी कायदेविषयक साक्षरता उपक्रमासाठी मान्यवरांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल आदरपूर्वक





आभार मानण्यात आले.

## महिला दिनानिमित्त तहसीलदार अमृता साबळे यांचा सन्मान

**संगमेश्वर । सत्यवान विचारे**

१ मे कामगार दिन व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत लोकनिर्माण वृत्तपत्राच्या वतीने संगमेश्वरच्या तहसीलदार श्रीम. अमृता साबळे यांचा कार्यक्षम अधिकारी म्हणून सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. व्यासपीठावर लोकनिर्माण वृत्तपत्राचे संपादक तसेच लोकनिर्माण प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्री. बाळकृष्ण कासार, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. दादा अनेराव, तहसीलदार अमृता साबळे, देवरुखच्या नगराध्यक्षा मृणाल शेट्ये, सहाय्यक गटविकास अधिकारी विनोद शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या वतीने 'हिरकणी पुरस्कार' प्रदान करण्यात आले. चार कार्यक्षम अधिकारी तसेच तीन गुणवंत कामगारांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरवून त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी महिला सक्षमीकरण, प्रशासनातील कार्यक्षमता आणि कामगारांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.हा सन्मान सोहळा लोकमान्य वाचनालय देवरुख येथे आयोजित करणेत आला होता.कार्यकर्माचे सूत्रसंचालन श्री, यु युत्सु आर्ते यांनी केले.




दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को–ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५